महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
रविराज क्रु मॉल इमारत, बिबवेवाडी कोंढवा रोड, बिबवेवाडी, पुणे ३७
Email - asakpal@punecorporation.org
दुरध्वनी क्र. – 020-25506958
जा.क्र शामअ/22 दि.- 3/5/2017

## अपिलाची सुनावणी

अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज.

दिनांक – ०३/०५/२०१७ — दिनांक – दुपारी ०३.०० वा.

स्थळ – महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, रविराज क्रु मॉल इमारत, बिबवेवाडी कोंढवा रोड, बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७.

प्रति,
**श्री.शैलेंद्र प्रभाकर दिक्षीत**
१९/६, क्लासिक विहार, पुण्याई नगर,
धनकवडी, पुणे ४११०४३.
मो.नं. – ९३७२१ ५५३९४
} **अपिलार्थी**

**श्री.मु.म.शेख**
महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
} **जनमाहिती अधिकारी तथा** उप अभियंता

### माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल

श्री.शैलेंद्र प्रभाकर दिक्षीत (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांचा माहिती अधिकारातील दिनांक ०९/०३/२०१७ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका (यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) यांना दिनांक ०९/०३/२०१७ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी सन २०१२ ते २०१७ या कालावधीतील प्रभाग क्र.७० अ मध्ये केलेल्या विकासकामाबाबतची माहिती विचारलेली होती.

**माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील**

| अर्जाचा दिनांक | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
|---|---|---|---|---|
| ०९/०३/२०१७ | ०९/०३/२०१७ | ०८/०४/२०१७ | --- | २३ दिवस |

अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती विहित मुदतीत न मिळाल्याने त्यांचा अपिल अर्ज दिनांक १०/०४/२०१७ रोजी अपिल अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे प्राप्त झाला.

**अपिल अर्जाचा तपशील**

| अपिल अर्जाचा दिनांक | अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १०/०४/२०१७ | १०/०४/२०१७ | अपिल अर्ज मुदतीत आहे. |

अपिलार्थी यांचे वरील अपिल अर्जावर दिनांक ०६/०५/२०१७ रोजी दुपारी ०३.०० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती परंतु, अपिलार्थी यांच्या मागणीनुसार सदरची सुनावणी ०३/०५/२०१७ रोजी दुपारी ०३.०० वाजता घेण्यात आली. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री.शैलेंद्र प्रभाकर दिक्षीत हे उपस्थित होते.

दिनांक ०३/०५/२०१७ रोजीच्या सदर दिनांकास श्री.मु.म.शेख जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते.

वरीलप्रमाणे संबंधित जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले त्यानुसार मी, अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे

**अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले 'आदेश'**

➢ जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीची माहिती अधिकार अर्जात नमूद केलेल्या कालावधीतील माहितीपैकी कार्यालयात उपलब्ध असलेल्या दस्तऐवजाची माहिती दि.११/०५/२०१७ रोजी साय.५.०० वाजेपर्यंत अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून देणेत यावी. तसेच ऑडिट विभागाकडे असणाऱ्या प्रकरणांबाबत सदरची प्रकरणे ऑडिट विभागाकडून उपलब्ध झालेनंतर अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच यापुढे माहिती अधिकारा अंतर्गत प्राप्त अर्जांची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास विहित मुदतीत उपलब्ध करून देणेची दक्षता घ्यावी.

कळावे,

3/05/17

(अविनाश सकपाळ)
**अपिलीय अधिकारी**
तथा
**महापालिका सहाय्यक आयुक्त**
बिबवेवाडी कार्यालय
पुणे महानगरपालिका.

प्रत –

१. श्री.शैलेंद्र प्रभाकर दिक्षीत, १९/६, क्लासिक विहार, पुण्याई नगर, धनकवडी, पुणे ४११०४३.
२. श्री.मु.म.शेख जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.